
ISSN No. : 2250-1649

API किंवा पीएच.डी. संशोधन अटींची पूर्तता करणारे निबंध आम्ही स्वीकारत नाही.

# मुराळी

एप्रिल २०२२

मूल्य : २० रुपये



वर्ष तेरावे । अंक एकशे सहासष्ट
एप्रिल, २०२२

API किंवा पीएच.डी. संशोधन अटींची पूर्तता करणारे निबंध आम्ही स्वीकारत नाही.

परिवर्तनाचा

# मुराळी

**संपादक** : राजन गवस

**मानद संपादक**
तुकाराम ऊर्फ टी. एस. गडकरी

**कार्यकारी संपादक**
आप्पासो बुडके

**संपादक मंडळ**
आसाराम लोमटे । नंदकुमार मोरे ।
गजानन जाधव । गोमटेश्वर पाटील ।
विजय बालघरे । संजय खोचारे ।

**सल्लागार मंडळ**
मेघा पानसरे । तनुजा शिपूरकर ।
सौ. ऊर्मिलादेवी श्रीपतराव शिंदे । सुचेता कोरगांवकर

**कायदा सल्लागार**
ॲड. ए. पी. पाटील (सांगाव कागल)

**जाहिरात व वितरण**
डी. के. पाटील, शिवाजी देसाई

**मुद्रणस्थळ**
भारती मुद्रणालय, कोल्हापूर

**व्यवस्थापक**
बी. वाय. पाटील, राम मेढेकर
संपर्क फोन नं. : ०८२७५४४९६१६,
०९४२११३८८७२, ९७६५७८७३१३

**वार्षिक वर्गणी :** रु. २००/-, तीन वर्षांसाठी : रु. ५००/-
**बँक खाते नं.** Bank of Baroda, Murali Trust
A/c. No. 38120100000285, **IFSC** - BARB0GARGOT

**पत्ता :** संपादक मुराळी, मु. पो. गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. पिन ४१६ २०९

## अनुक्रमणिका

**'हरवलेली वस्तू'मधल्या काही कविता**
प्रफुल्ल शिलेदार / ४

**कृषी स्वराज्य आणि आयडिया ऑफ इंडिया संकल्पना**
प्रकाश पवार / ९

**'खेळ खेळत राहतो उंबरा' : कथनबाज असलेली कविता** / अरुण ठोके/ १५

**कालगतीशी संवाद : 'कदाचित अजूनही'**
सरिता सोमाणी / २७

हे मासिक प्रकाशक, मुद्रक राजन गवस यांनी भारती मुद्रणालय येथे छापून मु. पो. गारगोटी येथे प्रसिद्ध केले. या मासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अंशत: अनुदान मिळाले आहे. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई व संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच, असे नाही.

# 'खेळ खेळत राहतो उंबरा' : कथनबाज असलेली कविता

**अरुण ठोके**

आशुतोष पोतदार हे एक महत्त्वाचे समकालीन नाटककार व कवी आहेत. त्यांचा 'खेळ खेळत राहतो उंबरा' हा एक लक्षणीय कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहात अनेक गोष्टी आहेत. या गोष्टींतील कथन वेधक आहे. या कथनातून परंपरेचा जागर व समकाळाचे कडू-गोड स्वर आळवलेले आहेत. कवितेतील शब्दांना असलेले मौखिकतेचे कोंदण व स्वाभाविकतेने अवतरलेली प्रतिमासृष्टी खासच आहे. आजोबा, मामी आजी, आई, प्रेयसी या नातेसंबंधांच्या विषयांना जसा या कवितेत वाव आहे, त्याचप्रमाणे ज्याच्याशी रक्ताचे नाते नाही असा मजूर व अशी अनेक व्यक्तित्वे आणि नर्मदा आंदोलन यासारखे विषयही कवितांतून आस्थेवाईकपणे आलेले आहेत. घर, खिडकी,आरसे, पन्हाळा, उंबरा, सावल्या, रविवार, संगणक, रस्ते अशा मूर्त वस्तूंना काव्यवस्तूंत स्थानांतरीत करून त्यांना काव्याशय बहाल करण्याचे कसब व अनोखी वाक्ययोजना कवीच्या अनवट शैलीचे कारण ठरते. या कवितांतील दृश्यात्मताही वेधक आहे. कवी भिन्न गुणविशेष दर्शविणाऱ्या दृश्यांची वा स्थितींची योजना करून त्याला कवितेत प्रक्षेपित करावयाचा काव्याशय या दृश्यांत बेमालूमपणे मिसळून सूचक अर्थ उभारतो. आता आपण 'खेळ खेळत राहतो उंबरा' या कवितासंग्रहातील कवितांचे विशेष पाहू.

या कवितासंग्रहाच्या आरंभी 'मामी आजी: एक' व 'मामी आजी :दोन' या दोन कवितांतून मामी आजीची प्रतिमा साकारली आहे. मामी आजी ही एक कष्टकरी स्री असून कवीला तिच्याविषयी आत्यंतिक आत्मीयता व स्नेह वाटतो. कवितेतून मामी आजीचे जे दर्शन घडते त्यातून तिच्या संयमी व कष्टाळू वृत्तीमुळे तिच्याविषयीचा आदरभाव वाचकांच्या मनात दुणावत जातो. मामी आजीच्या धावपळीची दिनचर्या आपल्या डोळ्यांसमोर उभी करणारी दृश्यात्मता 'मामी आजी: एक' या कवितेतून प्रत्ययाला येते. उदाहरणार्थ,

*खाली वर वर खाली इकडे तिकडे दिवसभर*
*वर वर भर भर उरका उरकी अजब काम*
*सतत सतत मर मर जग भर मायाळू आय*
*हश हुश्श साय सुट्ट नाय काय गाणारी गाय*
*पदर मोड जीव तोड गिरण गाव बोलावे काय*
*दळण कांडण भात भरण गाव जेवण भरली माय*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. ८)

म्हातारी मामी आजी दिवसभर करीत असलेली विविध कामे, तिला कामांत असलेला उरक आणि एकूणच कार्यबाहुल्यामुळे तिच्या जगण्याला प्राप्त झालेली लय शब्दांत पकडण्याच्या प्रयत्नातून प्रस्तुत संहिता घडलेली आहे. मामी आजीच्या काम करण्याच्या पद्धतीला शब्दांतून नेटकेपणाने बांधले आहे. त्यामुळे प्रस्तुत संहितेतून आशय आणि लय अभिन्न असल्याचा प्रत्यय येतो. 'र', 'य', 'ण' या अक्षरांच्या आवृत्तीने कवितेतील लयीला उठाव प्राप्त होतो. दोन- दोन शब्दांची चार भागांत आडवी मांडणी केल्याने मामी आजीच्या काम करण्याच्या गतीला अचूक टिपले आहे. पोतदारांच्या कवितेचे रूपदक्षता व अल्पाक्षररमणीयता हे शैलीविशेष ठळकपणे प्रत्ययाला येतात. 'मामी आजी : दोन' या कवितेतून 'कवितेतील मी' ने मामी आजीशी संवाद करीत तिच्याविषयी कथन केलेले आहे. या कथनात तिचा कामातील सफाईदारपणा, समयसूचकता, सूर्यकिरणांकडे बघून वेळेची मोजणी करण्याचे कसब, इतरांविषयीची पराकोटीची अनुकंपावृत्ती आणि मायाळूपण अधोरेखित होते. 'मामी आजी : दोन' या कवितेतून मामी आजीच्या लौकिक जीवनाचे तपशील तिची कहाणी सांगण्यासाठी योजले आहेत. जसे की आजी व म्हाताऱ्यात गुजगोष्टी न होणे, परंतु ढेकणांसमवेत गुजगोष्टींचा उरूस भरणे, या घटितातून आजीच्या सोशिकतेचे दर्शन घडते. स्वतः सुखाच्या अभावात आयुष्य जगलेली आजी आपल्या दुखाःना कष्टांत पिसून बाजूला सारून ठेवत असे. इतरांचे

सांत्वन करायला आपल्या परीने पुढे येत असे. नातवंडे-परतवंडांच्या आनंदाने ती मोहरून येते, समाधानाने भरून पावते. नातवाने आजीच्या जवळ जाणे, ही कृती नातवाला मिळणाऱ्या आजीच्या प्रेमळ स्पर्शानुभूतीचा प्रत्यय 'गात्रांच्या मोगरमायेत शिरणे' या प्रतिमेतून साकारलेला आहे.

'ढेकुण रात्री' ही एक वेधक संहिता आहे. यात तीन गोष्टी आलेल्या आहेत. पहिली कवितेतील 'मी'ची. दुसरी धनुष्यभर वाकलेल्या म्हातारीची. तिसरी ढेकणांची. या तीन गोष्टींच्या योजनेतून कवितेतील कथन साकारलेले आहे. या कथनाचा पसारा ढेकणांच्या असण्याशी जुळलेला आहे. कवितेतील 'मी' च्या मनोवस्थेशी त्याचा संबंध आहे तसाच म्हातारीच्या व कवितेतील 'मी'च्या नात्याने तो व्यापलेला आहे. या कवितेतील 'मी' स्वतःवरच टीका करतो. एकेकाळी ढेकुण चावत असतानाही त्याला झोप येत असे. भूतकाळात ढेकणांशी जुळवून घेणारा 'मी' वर्तमानात ओडोमास ही क्रीम त्वचेला लावून घेतो. डास-ढेकुण चावण्यापासून स्वतःचा बचाव करून घेतो. आपली त्वचा टँड कातडी झाल्याचे सांगतो. अशा त्वचेला थोडे उष्ण वा थोडे थंड पाणीही सहन होत नाही. कवितेतील 'मी' हा महानगरात नोकरी करीत असल्याचे तपशील त्याने स्वतःविषयी केलेल्या कथनातून येतात. रात्री झोपल्यावर पाठीशी वळवळणाऱ्या ढेकणांच्या हालचालींनी त्याला जाग येते. आजूबाजूला घडणाऱ्या इतर घटनांचा त्याच्या झोपेवर काहीही परिणाम होत नाही. मात्र त्याच्या पाठीशी वळवळलेल्या ढेकणांमुळे तो जागा होऊन त्यांचे निरीक्षण नोंदवतो ते असे,

*तीन चार ढेकणं*
*रोमान्स करत होती*
*भांडण करत होती*
*गप्पा मारत होती*
*शांत बसली होती*
*सेक्स करत होती*
*एक लुकडं*
*एक तपकिरी काळपट*
*एक जीव नसलेलं*
*एक कसंतरी चालणारं*
*किरकिरी*
*चिडचिडी*
*कुबट*
*विस्कटलेली*
*खाजवणारी*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. १५)

ढेकणांविषयीच्या या तपशिलातून माणूस व सृष्टीच्या पसाऱ्यातील अतिशय दुय्यम मानला जाणारा ढेकुण व माणूस यांच्यातील हजारो वर्षांच्या सहअस्तित्वाकडे कवीने आपले लक्ष वेधले आहे. माणूस झोपलेला असताना ढेकुण माणसाचे रक्त पिऊन जिवंत राहतात. त्यामुळे ते माणसावर अवलंबून असतात. कवितेतील 'मी' ने ढेकणांच्या व्यक्तीत्वांशी एकरूपता साधल्याने माणसांप्रमाणेच ढेकणांचे वर्तनव्यवहार असल्याचे वर्णन कवितेतून करण्यात आलेले आहे. ढेकणांच्या प्रतिमांतील वैविध्य दर्शविण्यासाठी मानवी शरीरविशेष व स्वभावविशेषांचे आरोपण ढेकणांच्या वर्तनावर करण्यात आलेले आहे.

दुसरी गोष्ट वाड्यात राहत असलेल्या म्हातारीची आहे. एकेकाळी बालविधवा झालेल्या कोवळ्या मुलीने संपूर्ण आयुष्य माजघरातील अंधाऱ्या खोलीत काढले. कवितेतील 'मी' ला तिच्याविषयी अपार कुतूहल, प्रेम व करुणा वाटते. ती म्हातारी होऊन मरेपर्यंत डोईवरचे केस भादरून घ्यायची. तिने आपल्या परंपरेचे संवर्धन इमाने-इतबारे केले. तिच्या मिश्कील स्वभावाचा व प्रेमाचा कवितेतील 'मी'च्या मनावर खोलवर प्रभाव पडतो. कवितेतील 'मी' व म्हातारी यांच्यातील नात्याचे नाट्यही कथनातून अनुभवाला येते. कवितेतील 'मी' म्हातारीला तिचा पदर डोईवरून खाली घ्यायला लावत असे तेव्हा ती तिचे खरबरीत हात अत्यंत प्रेमाने त्याच्या गालांवर फिरवत असे. तिचे लाजणे त्याने टिपले होते. त्याला तिचे पांढरे केस एम.एफ. हुसेन यांच्या एका चित्रातील म्हातारीच्या पांढऱ्या केसांप्रमाणे वाटतात. घरादारासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारी म्हातारी कष्ट करून-करून धनुष्यासारखी पाठीत वाकून जाते. तिला मृत्यू आल्यावर तिची अवहेलना होते. कथनकार

म्हणतो की, तिच्या डोईवरून ढळलेला पदर सावरायला कोणीच आले नाही. परंपरेचे जोखड तिने कधीच भार मानून जीवन जगले नाही. तिच्या मृत्यूनंतर मात्र घरातील माणसांपैकी कुणालाही दुःख न होणे, हे नात्यातील माणसांच्या संवेदनहीनतेचे द्योतक ठरते. संपूर्ण आयुष्य तडजोडीत जगताना खूपच कष्ट केल्यामुळे तिचे शरीर धनुष्यासारखे पाठीत वाकलेले होते. ती मेल्यावर हा वाक जाईना म्हणून प्रेत सरणावर झोपविण्यासाठी तिची पाठ मोडण्यात येते. या घटितांतून कथनकार स्रीवर परंपरेच्या नावाखाली जिवंतपणी आणि मृत्यनंतरही होणाऱ्या अत्याचारांची सूचक जाणीव करून देतो. व्यवस्थेच्या क्रौर्याचे दर्शन घडवतो. याउलट तिचे रक्त पिणारे ढेकूण ज्यांनी तिला आयुष्यभर साथ दिली त्यांनी तिच्यासाठी मातम केला. माणसांनी माणुसकी सोडून वागणे व ढेकणांनी सहहृदयी होत मातम करणे, या परस्परविरोधी घटितांची योजना करून कवीने या कथनातून ज्ञाननिर्मिती केलेली आहे. ही ज्ञाननिर्मिती सूचक आहे. ती मानवी संवेदनांच्या सहेतुक व विवेकपूर्ण वापराची अपेक्षा करणारी आहे. विधवा म्हातारीला घरातील माणसांपेक्षा ढेकुण जवळचे वाटणे, त्यांनी तिच्यासाठी मातम करणे, हे वर्णन कवितेतील अर्थक्षेत्राची व्याप्ती दर्शवते. यातून परंपरेची चिकित्सा, मानवी नातेसंबंधातील स्वार्थीवृत्ती व परंपरा संवहनाच्या क्रूर प्रथेतील दोषांवर नेटकेपणाने बोट ठेवलेले आहे.

या कवितेत आलेली त्रियुग्मेही वेधक आहेत. उदाहरणार्थ ढेकूण, कवितेतील 'मी' व म्हातारी, तीन रात्री-जसे की, कालची रात्र, सात वर्षांपूर्वीची रात्र व दहा वर्षांपूर्वीची रात्र. यातील ढेकूण, कवितेतील 'मी' व म्हातारी यांचे परस्परांशी नाते आहे. तीन रात्रींचे युग्म तीन परिणाम दर्शविते. कालची रात्र कवितेतील 'मी' च्या वर्तमान स्थितीचा निर्देश करते. 'वळवणे' या घटिताने 'मी' चे चित्त विचलित होते. त्याच्या असहायतेचे कारण ढेकुण आहेत. सात वर्षांपूर्वीच्या रात्रीत ढेकूण व म्हातारी यांच्यातील सख्यत्वाचे संदर्भ आलेले आहेत. तर तिसऱ्या म्हणजे दहा वर्षांपूर्वीच्या रात्रीत म्हातारी व कवितेतील 'मी' यांच्यातील हृद्य नात्याचा स्मृतीजागर केलेला आहे. यातही ढेकूण महत्वाचे आहेत. एकुणच या कवितेतील कथन असे तीन युग्मांच्या योजनेतून साकारलेले आहे. या संपूर्ण कथनाचे केंद्र ढेकूण आहेत. व्यवहारात ढेकणांना रक्तपिपासू मानले जात असल्याने ते उपद्रवी ठरतात. माणसाच्या शांतीभंगाचे कारण मानले जातात. प्रस्तुत कवितेत ते याउलट अर्थाने आलेले आहेत. ढेकणांच्या प्रतिमेच्या प्रचलित अर्थाचे उल्लंघन करून कवीने नवी शैली घडवलेली आहे.

वस्तुमात्रांना केंद्रस्थानी ठेवून काव्याशय घडविण्याचे खास कसब हे पोतदारांच्या काव्यलेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ, 'हे घर' या कवितेत घराच्या जिवंत व्यक्तित्वाची कल्पना करून कवी घराच्या नजरेतून घरात घडणारी, घडलेली विविध दृश्ये, स्थिती या याविषयीचे भाष्य करतो. या कवितेतील कथन हे विविध दृश्यांतून साकारलेले आहे. त्याची खाशियत म्हणजे घर या वस्तुमात्रासमवेत अन्य चिन्हांची तपशीलबहुल उपस्थिती, प्रकाश, नाद व रंग संवेदनांची तरल जाणीवजागृती होय. उदाहरणार्थ,

*रंगरेषांनी उजळलेल्या या घरात*
*मिणमिणत असतो दिवा*
*दूरवरून ऐकू येणाऱ्या घंटेचे गाणे*
*दर्शनाला येणारे पक्षी*
*ध्यानस्थ बसलेले रंग*
*रांगोळी रेखाटायला आतुर शब्द*
*पडू देत नाहीत अखंड तेवणाऱ्या वातीला*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. १७)

यातील तपशील सामान्य विधानांतून न येता काव्यात्मक विधानांतून साकारतात. जसे की, दर्शनाला येणारे पक्षी या विधानातील पक्ष्यांनी दर्शन घेणे या विधानातून पक्ष्यांच्या मनात घराविषयी भक्तीभाव असल्याचे ध्वनित होते. घराला दिलेले रंग हे ध्यानस्थ बसलेले आहेत या आणखी एका विस्मयकारक विधानातून कवी हे घर वा या घरातील माणसे ही स्थिर मनोवृत्तीची शांत व प्रेमळ असल्याचे सूचित करतो. ही माणसे परस्परांची काळजी घेणारी आहेत, याचा प्रत्यय शब्दांविषयीच्या तपशिलांतून येतो. वास्तविक शब्द हे

अमूर्त आहेत, निर्जीव आहेत. कवितेत ते रांगोळी रेखाटायला आतूर असल्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. शब्दाचा चिन्हार्थ माणूस असा घेतला तर त्यांचा उच्चार करणारी घरातील माणसे रांगोळी रेखाटायला म्हणजे सणावाराप्रमाणे रोजच आनंदी रहायला आतुर आहेत, हे लक्षात येते. घरातली दिव्याची वात कधीही विझू दिली जात नाही, या विधानातून घरातील माणसांच्या सत्मार्गी व विवेकी वृत्तीचा प्रत्यय येतो. अशा रीतीने मानवी वर्तनव्यवहाराचे आरोपण वस्तुमात्रांच्या जिवंत व्यक्तिमत्वांत साकारून ते कथनातून अवतरत राहते. यामुळे तपशीलबहुलता व दृश्यात्मता ही या कथनाची निकड बनलेली दिसते. या अनुशंगाने घराविषयीचे तपशील हे मानवी व मानवेतर विश्वाचे दुहेरी अस्तर दाखविण्यासाठी आलेले आहेत. घराने नेहमीच वादळ-वाऱ्याला तोंड देण्यासाठी सज्ज असणे, नात्यांच्या महाकाव्यांचे अर्थ लावणे, गोंधळात पाडणारे प्रश्न घराला पडणे, बनत असलेल्या जेवणाची चव तपासून पाहणे ही घटिते मानवी भाव-भावनांचे, कृती-उक्तींचे पडसाद म्हणून आलेली आहेत. हे कथन स्वाभाविकच मानवी भावविश्वाचा उलगडा करण्यासाठी नियत झालेले आहे. तसेच दूरवरून येणारे पक्षी, रानवट कबुतरे, किंगफिशर, कावळ्यांच्या कर्कश ताना, रातराणीचा वास हे तपशील आपण दुर्लक्षित केलेल्या मानवेतर अस्तित्त्वांचे मानवी अस्तित्त्वाशी असलेली अतूट नाते दाखवतात. वास्तविक जगात माणूस पक्षी व इतर जीवमात्रांना गृहीत धरतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. त्यांना दुय्यम मानतो. कवी या कथनातून त्यांना केंद्रस्थानी आणून कवितेत केवळ घराविषयी न बोलता या अन्य दुय्यम मानल्या जाणाऱ्या तपशिलांची योजना केंद्रस्थानी करून वाचकाला अंतर्मुख बनवतो. यातून या कथनाची महत्ता अधोरेखित होते. या कवितेच्या शेवटी घराचे अस्तित्त्व हे घरातील स्त्रीमुळेच महत्त्वाचे बनते. स्त्री नसेल तर घराचे घरपण जाते. किंबहुना स्त्रीमुळेच घर ही संकल्पना अस्तित्वात आली. या अर्थाने आईने बांधकाम केलेल्या भिंती कणखर आहेत, या भिंतीही नवे चित्र बनवत राहतात, या कल्पनेतून कवी घराला सुंदर करणारी, त्याला जिवंत ठेवणारी त्यात उल्हास भरणारी व्यक्ती ही आई असल्याची वैचारिकता सूचित करतो.

दृश्यात्मता हा कथनविशेष 'लोंबकळणारा रविवार' व 'मेटॅमॉरफॉसिस' या दोन कवितांतून विशेषत्वाने प्रत्ययाला येतो. या दृश्यांत असलेले नाट्य, या दृश्यांतील कॉमेंट्री वर्तमानाचे अनेक आयाम दर्शविणारी आहे. 'लोंबकळणारा रविवार' या कवितेत महानगरीय वास्तवाचे चित्रण केलेले आहे. रविवारचे लोंबकळणे या वर्णनातून नित्य कृतींचा मंदावलेला वेग सूचित झालेला आहे. या कवितेच्या पुर्वार्धात घरातील दृश्यांमागील गतीचा मंदावलेला वेग तर उत्तरार्धात घराबाहेरील रस्त्यावरील माणसांच्या गतीचा ढेपाळलेला वेग दृश्यांतून साकारत रविवार या दिवसाच्या मानवी व्यवहारांत झालेल्या शारीर-मानसिक बदलांतील सूक्ष्मता सूचित होते. तर 'मेटॅमॉरफॉसिस' या कवितेत केवळ दृश्येच चित्रित केलेली आहेत. मेटॅमॉरफॉसिस म्हणजे कायापालट किंवा रूपांतरण होय. या कवितेत दोन प्रकारची दृश्ये आहेत. पहिल्या दृश्यात रस्त्याकडेच्या कोपऱ्यावर उघड्यावरील संसारी स्त्रीचे चित्रण केलेले आहे. तर दुसऱ्या दृश्यात अलिशान बंगल्यातील संसारी स्त्रीच्या कुटुंबाचे चित्रण केलेले आहे. उघड्यावर संसार असलेल्या स्त्रीने लेकरांना वेळीच खाऊ-पिऊ घालून, ती आवरून-सावरून बसली आहे. तिच्याकडे 'सगळंच' आहे हे सांगताना कथनातील स्वयंपाकाच्या भांड्यांचा उल्लेख हा तिच्या कमीत कमी गरजांत जीवन जगण्याच्या समाधानी वृत्तीचे द्योतक ठरतो. तर दुसऱ्या दृश्यात भलेमोठे स्वयंपाकघर, बेडरुम, बेडरुममध्येच पोरांसाठी खेळघर आदी सुखवस्तू, या चैनखोर जीवनाचे संदर्भ आलेले आहेत. उघड्यावर संसार असलेल्या बाईच्या घरभर खेळणारी लेकरे आहेत. त्यांच्यासोबत पावसाळ्यात जमिनीतून निघणाऱ्या टोलेजंग अळ्या आहेत. झोपडीसमोर मंदिरातील शोपीसप्रमाणे नटून असलेले हनुमान अळ्यांच्या कायापालटाचे साक्षी म्हणून उभे आहेत. कथनातून आलेले हनुमान हे दैवत पुराणात कायापालटासाठी प्रसिद्ध आहे. वर्तमानातील हनुमानाच्याच समोर असलेल्या स्त्रीचे दुःख, कष्ट पाहून ते काहीच करीत

नाहीत. हे वास्तव अधोरेखित करून या कथनातून ईश्वरविषयक अनुभूतीतील कोरडेपणा ध्वनित झालेला आहे. कवितेत लौकिक पातळीवर दिसणारा कायापालट हा 'रात्रीच्या वेळी रस्त्यात डांबरात उजळलेले पिवळे खांब' या काव्यात्म विधानातून काळा रंग म्हणजे रस्त्याकडेच्या कोपऱ्यावरील अंधारातील, असुरक्षित इतरांवर अवलंबून असलेला संसार तर पिवळा रंग म्हणजे दुसऱ्या दृश्यात असलेला सुरक्षित बंगल्यातील संसार. ही रंगानुभूतीची योजना वेधक आहे. एका दृश्यातून कमालीची गरिबी तर दुसऱ्या दृश्यातून ओसंडून वाहणारी श्रीमंती! गरिबाचे तडजोडीतही समाधानात जगणे तर श्रीमंताचे अस्वस्थ जगणे या दोहोंचाही कायापालट व्हायला हवा, हे दर्शविणारे 'मेटॅमॉरफॉसिस' हे कवितेचे शीर्षक अनुरूपच आहे.

महानगरीय वास्तवाचे संवेदन हा पोतदारांच्या कवितेचा महत्त्वपूर्ण विशेष आहे. 'या शहरातल्या घराच्या उंबऱ्यावरून', 'खेळ खेळत राहतो उंबरा', 'कूस बदलतो चिकट तळवा', 'अ नॅप इन अ टॉयलेट', 'आरसे', 'स्थळ : कॅफे कॉफी डे ' व 'मेलेला त्याचे आत्मकथन' या कवितांतून महानगरीय वास्तवाचे विविध आयाम पाहायला मिळतात. 'या शहरातल्या घराच्या उंबऱ्यावरून' या कवितेत चप्पल व स्लीपर या वस्तूरूपांना जिवंत व्यक्तित्त्वे कल्पून कवी स्लीपर व शूज यांच्या नजरेतून महानगरातील घराचे हरवलेले घरपण व हरवलेले माणूसपण अधोरेखित करतो. शहरातल्या घराच्या उंब-याचे महत्त्वं नावापुरता उंबरा, लाकडी अडथळा व बाहेरचे पाणी आत येऊ नये, ही उपयोगिता म्हणून बसवलेला आहे. उंबऱ्याच्या आतील माणसे घराबाहेरून येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांशी संवाद व संपर्कहीन झालेली. त्यामुळे एकमेकांच्या सुख दुःखांची साक्षी असणारा खेड्यातील उंबरा शहरातील माणसाच्या कोरडेपणाचे, तुटकपणाचे प्रतीक ठरतो. अशा मानवी वर्तनातील बदलांकडे सूक्ष्मतेने पाहणारे भावसंवेदन चप्पल व स्लीपर यांच्या तोंडून असे प्रकट झाले आहे,

*कधीतरी दिसायचे*
*माझ्या चपलांना आणि स्लिपरींना*
*रस्त्यावरचे चेहरे*
*त्यांच्या नजरा*
*उत्सुक डोळे*
*टवकारलेले कान*

*इथल्या घराच्या उंबऱ्यावरून*
*दिसतात फक्त बंद दरवाजे*
*ऐकू येणारे वाहनांचे आवाज*
*सेल्समनने कुठेतरी वाजवलेली बेल*
*रेंगाळत जाणाऱ्या भाजीवाल्याची हाक*
*अन पावसाळ्यात*
*चाकांबरोबर उडणाऱ्या पाण्याचा आवाज*
*पडलेले स्लिपर चप्पल आणि शूज*
*पाहत बसतात एकटक*
*न दिसणाऱ्या चेहऱ्यांकडे*
*या शहरातल्या घराच्या उंबरठ्यावरून*

(खेळ खेळत राहतो उंबरा,पृ.२४)

या वर्णनातून माणसांनाच माणसांचे चेहरे न दिसणे, त्यांनी परस्परांशी संवाद न करणे, संवाद केलाच तर अतिशय त्रोटक व कामापुरता असणे, यातून महानगरीय माणसांच्या सामाजिक व्यवहारांत असलेल्या कोरडेपणाची जाणीव करून देण्यात आलेली आहे. 'खेळ खेळत राहतो उंबरा' या कवितेतील चित्रण अपारंपरिक पद्धतीने केलेले असल्याने कवितेतील कथ्य विषय खास कथनरीतीने फुलवलेला आहे. या कवितेत व्यक्तीच्या वर्तनाविषयी माहिती देणारी मी, तो, ती, आपण ही संबोधने वस्तूरुपांसाठी योजण्यात आलेली आहे. वस्तूरूपांना जिवंत व्यक्तीत्त्वे कल्पिल्याने त्यांच्या माध्यमातून मानवी वर्तनव्यवहाराचे दर्शन घडवले आहे. उदाहरणार्थ पावलांचा इंतजार करणारे मर्यादापुरुषोत्तम स्लिपर्स, दारे खिडक्यांनी लगबगीने माना फिरविणे, दुधाच्या पिशव्या, देशभक्ती दाराबाहेर पाठ टेकून बसून राहणे, रात्रभर मोबाईलवर उधळलेल्या मेसेजेसने उणीदुणी काढत राहणे इत्यादी. या वर्णनातून मानवी कृतींचा उपहास केलेला आहे. महानगरातील माणसांच्या जीवनाला आलेले रोडावलेपण, अध्यात्मिकतेलाही आधुनिकतेने चढवलेला बेगडी साज, श्रद्धेतील कृत्रिमता यामुळे माणसे निखळ आनंदानुभूतींपासून दुरावत आहेत.

घरोघरचे वास्तव एकरेषीय होत असल्याने कवी या स्थितीला दर्शविण्यासाठी 'हा असाच खेळ खेळत राहतो उंबरा' असे म्हणतो. येथे उंबरा या प्रतीकाचा बदललेला चिन्हार्थ समकालीन मानवी सामाजिक-सांस्कृतिक अवकाशाचे स्थानांतरण दर्शवतो. उंबरा हे घराच्या सुरक्षेचे, मर्यादेचे, मालकी हक्काचे, एखाद्या कुटुंबाच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. प्रस्तुत कवितेत मात्र उंबरा हा सेंद्रिय काव्यवस्तू म्हणून आल्याने त्याचे खेळ खेळत राहणे म्हणजे घरातील माणसांचे नाना विविध प्रकारचे भले बुरे वागणे, एकमेकांना दिलेले साद-प्रतिसाद होत. माणसांच्या या नित्य वर्तनव्यवहाराला कवीने 'खेळ' असे म्हटले आहे. या जीवनविषयक उपमेतून जीवनाकडे खिलाडू वृत्तीने पाहावे, खेळातून मिळणाऱ्या निखळ आनंदाप्रमाणे जीवन भरभरून जगणे, जीवनातील छोट्या-मोठ्या गोष्टींतून,कृतींतून आनंद घ्यावा व पेरावा, असे सूचित केले आहे. या प्रतीकाच्या योजनेचा मूलाधार संतकवी तुकारामांच्या खेळांवरील विविध अभंगांच्या योजनेतील आशयाशी साधर्म्य राखणारा आहे. या दृष्टीने आशुतोष पोतदारांची कविता, आपल्या काव्यपरंपरेतील सकस धारेशी जुळलेली आहे. समकालीन मराठी कवितेतील हे भूमितत्त्वाचेचे भान विरळे आहे.

महानगरातील रात्र हा कवीच्या कुतूहलाचा विषय ठरते. महानगर रात्रीच्या वेळी कसे दृश्यमान होते याचे चित्रण 'कूस बदलतो चिकट तळवा' या कवितेत करण्यात आलेले आहे. उदाहरणार्थ,

*भरलेली रात्र ओसंडून*
*वाहत असते*
*दुकाने थाटून असतो*
*ड्रीमाळलेला मालक*
*गिऱ्हाईकांची वाट बघत*
*अंथरलेला दिवस*
*घोरत असतो*
*शिणले उद्गार*
*पांघुरणाला ओढून घेतात*
*नको असणाऱ्या आठवणी*
*घाम आणणाऱ्या स्वप्नांना लांघण्यासाठी*
*कूस बदलतो चिकट तळवा*
*आढ्यावरली पाल चुकचुकत राहते*
*वॉट्सअ‍ॅपच्या मेसेजेस मधून*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. ३२)

पोतदारांच्या या व अन्य कवितांतील कथानांतून अपारंपरिक धारणा निर्माण करणारी प्रतिमासृष्टी नियत होते. ड्रीमाळलेला मालक या प्रतिमेतून महानगरातील वास्तुविक्रेत्या मालकाच्या पैसालोलुपवृत्तीचा भाव संवेदित होतो. 'कूस बदलतो चिकट तळवा' या स्पर्शानुभूतींची संवेदना देणाऱ्या प्रतिमेतून कष्टकरी माणसाची गोष्ट ध्वनित होते. कष्ट करून रात्री घरी परतणाऱ्या माणसाला महानगर कसे दिसते व भासते याचे तटस्थ कथन यात करण्यात आलेले आहे. रस्त्याच्या कडेने दिसणारी दुकाने, वाहनांची वर्दळ यामुळे रात्र भरलेली वाटते. त्याचे थकलेपण, कष्ट यातना, त्याच्या मनातील भाव-भावनांचे 'अंथरलेल्या दिवसाचे घोरणे' या प्रतिमेतून नादसंवेदन करण्यात आलेले आहे. तसेच 'अ नॅप इन अ टॉयलेट' या कवितेतही अशा थकलेल्या महानगरी माणसाचे चित्रण केलेले आहे. टोयलेटमध्ये घेतलेल्या मिनी कुंभकर्णी डूलकीची गोष्ट यात आहे. त्यासाठी केलेली दृश्ययोजना कथनाचा पैस वाढवणारी आहे. महानगरातील माणसाच्या विचार-कृती बिघाडाचे संसूचन करताना कवितेतील 'मी' ला कोकिळेचा आवाज मंजुळ वाटण्याऐवजी कर्कश वाटणे, संडासाच्या भांड्यानेच कूस बदलत कानाजवळ रेंगाळत राहणे, बाहेरील उसाशांचे आवाज मस्तकाच्या शिरेपर्यंत धडकून परत येणे व नळातून ठिबकणाऱ्या पाण्याने अधे मध्ये गुराख्याच्या काठीप्रमाणे 'जगते रहो' ची जाणीव करून देणे, कवितेतील 'मी' ला संडासाच्या दरवाज्याची कडी आतून लावल्याची पुन्हा-पुन्हा खात्री करावीशी वाटणे, या घटितांतून महानगरातील माणसांच्या तणावाचे अदमास बांधता येतात. यातून महानगरी माणसाच्या जीवनातील निवांतपण हरवून गेल्याचे भान ध्वनित होते. थोडक्यात हे कथन महानगरातील माणसांच्या बिघडलेल्या स्वास्थ्याची प्रखर जाणीव करून देते. तर 'आरसे' या कवितेत भांडवली व्यवस्थेने समूहमनावर केलेल्या खोलवर प्रभावाचे अनेक कंगोरे

दाखवले आहेत. सिनेमातील नट-नट्यांप्रमाणे दिसण्याचा आटोकाट प्रयत्न करणारी तरुणाई स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्वच हरवून बसते. आभासी प्रतिमांप्रमाणे सुंदर दिसण्याच्या भंपक कल्पनांत फसलेल्या माणसांना सावध करण्यासाठी आरसे घेण्याचे उपहासात्मक आवाहन निवेदक करतो. कोपऱ्या-कोपऱ्यावर आरसे पडलेले असून ते विनासायास मिळतात. ते मिळविण्यासाठी खास कष्ट घ्यावे लागत नाहीत. ते क्रेडीट कार्डवर, फोनच्या एका रिंगसरशी उपलब्ध होऊ शकतात. ते कशासाठी घ्यायचे याविषयीची कॉमेंट्री पहा,

*सतर्क करू शकता स्वतःला*
*वेगवेगळ्या कोनातून*
*निरखू शकता*
*सहजासहजी न दिसणाऱ्या*
*शरीरातल्या छुप्या रुस्तमांना*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. ४४)

आरश्यांना बँकांचे लोगो बिलगले आहेत, आरशांवर ब्रँन्ड अँबिसिडर म्हणून ठराविक लोकांचेच चेहरे दिसतात. या संदर्भांवरून समाजातील भांडवली स्थितीच्या असमतोलाचे भान ध्वनित झालेले आहे. नट-नट्यांच्या शारीरिक अवयवांप्रमाणे आपले अवयव, लांबी-रुंदी व गोलाई तपासून पाहणे, अशा हास्यास्पद कृतींचे विडंबन या कथनातून करण्यात आलेले आहे. 'स्थळ : कॅफे कॉफी डे' या कवितेत गरीब व धनिकांच्या जीवनाची तुलना दर्शविणारी दृश्ये चित्रित करण्यात आलेली आहे. गरिबांच्या विकासाच्या बाजूने भूमिका घेणाऱ्या अमर्त्य सेन या अर्थशास्त्रज्ञाच्या विचारांकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाकडे कवी लक्ष वेधतो. एकीकडे उपासमारीने मरणारे लोक तर दुसरीकडे चंगळवादाच्या आहारी गेलेल्या लोकांचे जीवन दृश्यांतून साकारत समाजातील वाढत्या आर्थिक विषमतेला काव्याशयातून ठळक केले आहे. 'मेलेला त्याचे आत्मकथन' या कवितेतही मजुराप्रतीची अनुकंपा प्रकट झालेली आहे.

प्रस्तुत कवितेत एका मरण पावलेल्या बांधकाम मजुराची गोष्ट आहे.ती गोष्ट त्याच्या आत्मकथनातून साकारलेली आहे. छोट्या नगरांचे मोठ्या शहरांत व शहरांचे मोठ्या महानगरांत रुपांतर होतांना ग्रामीण भारतातील छोट्या गावांतील अनेक तरुण रोजगाराच्या शोधार्थात महानगरांत येतात. या महानगरांतील विशाल रस्ते, मोठ्या इमारतींचे टॉवर्स, महानगरांत निर्माण करावयाचे बगीचे अशा विविध प्रकारच्या बांधकामांसाठी या तरुणांनी आपला घाम व रक्त आटवलेले असते. त्यांना दिलेल्या अल्प मजुरीतच त्यांनी कृतार्थ राहणे, अशी व्यवस्थेची अपेक्षा असते. या मजुरांचे शहरांतील अस्तित्व हे उपलब्ध असलेल्या कामावर अवलंबून असते. एका ठिकाणचे बांधकाम पुर्ण झाले की त्यांना दुसऱ्या ठिकाणी नेले जाते. महानगरांतील माणसे त्यांना सतत उपरे मानत असतात. हे तरुण गावाला दुरावलेले असतात व महानगरातही आपण परागंदा असल्याचा अनुभव पदोपदी घेत असतात. अशाच एका बांधकाम मजुराचे कामाच्या ठिकाणी निधन झाल्यावर निर्माण झालेल्या स्थितीचे त्याच्याच नजरेतून केलेले कथन म्हणजे ही संहिता होय. विशेष म्हणजे महानगरात आलेल्या अशा बांधकाम मजुरांची कोणतीही अधिकृत नोंद घेणारी शासकीय यंत्रणा सक्रीय नसल्याने तो कोण? त्याचे नाव काय? किंवा त्याच्याविषयी कुणालाही फारसे काही जाणून घेण्यात रस नसतो. बांधकाम मजूर हीच एक त्याची ओळख. म्हणून त्याच्या मृत्यूने महानगरातील समाजाला फारसे काही सोयरेसुतक नाही. मेलेला बांधकाम मजूरच कवितेतील 'मी' म्हणून जिवंत होऊन स्वतःच्याच मृत्युनंतर आपल्या वर्तमान भूत-भविष्याविषयी बोलत आहे. कवीने हे कथन रचताना निवेदकाकरवी अथवा तटस्थपणे स्वतःच का रचले नाही? असा प्रश्न पडतो. मेलेल्या बांधकाम मजुरालाच का बोलते केले? भारतीय समाजात अशी परंपरा आहे की, ज्या घरी मृत्यू झाला असेल त्या घरातील माणसांना अतीव दुःख झालेले असते. भावनिकदृष्ट्या आधार देण्यासाठी नात्यातील भाऊबंदकीतील, शेजारी व गावातील माणसे मृत व्यक्तीच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होतात. मृताच्या अंत्यविधीची तयारी भाऊबंद व नातलग करतात. मेलेल्या व्यक्तीच्या चांगल्या स्मृती जागविल्या जातात. त्याच्याविषयी, घडून गेलेल्या घटनेविषयी कुटुंबातील सदस्यांशी अनेकजण बोलतात.

त्यामुळे कुटुंबियांना आधार, दिलासा मिळतो. एकटेपणा वाटत नाही. महानगरातील बांधकाम मजुराचे गाव शेकडो किमीवर आंध्र प्रदेशात आहे. त्याचे नातलगही तिकडेच असावेत. तो शहरात मरून पडल्यावर त्याची बायको पुर्णतः एकटी पडलेली आहे. तिला धीर द्यायला कुणीच नाही. महानगरातील बांधकाम मजुराचे माणूस म्हणून असलेले अस्तित्व किती गौण करण्यात आलेले आहे, हे महानगरातील माणसांचे अमानवीपण, त्यांच्या संवेदनहीनतेचा प्रत्यय मेलेल्या बांधकाम मजुराच्या आत्मकथनातून येतो. माणूस मरून पडल्यावर त्याचे कुणालाच काही न वाटणे हे घोर हिंसक वाटावे असे वर्तन महानगरीय समाजाच्या बिघडलेल्या स्वास्थ्याचा निर्देश करते. या कथनातून बांधकाम मजूर आपल्या मृत्यूचा शोक करीत नाही. तर तो स्वतःला जिवंतच समजत असतो. त्यामुळे या कथनातील घटितांतून रंजकता, उपहास व चिंतनशीलता प्रकट होत राहते.

कवितेच्या पुर्वार्धात, कोसळणाऱ्या पावसाचे पाणी, या बांधकाम मजुराच्या निळ्या प्लास्टिकच्या ताडपत्रीच्या झोपडीशेजारील प्रेताच्या अंगावर पडत आहे. या कथनातील 'निळ्या प्लास्टिकच्या ताडपत्रीचे' छत हे त्याच्या गरीबीचे, तात्पुरत्या रहिवासाचे, अशाश्वतीचे प्रतीक ठरते. त्याने जिवंतपणी भोगलेल्या वेदनांतून त्याची मुक्ती झाल्याचा मनस्वी आनंद पावसाला झाला आहे म्हणून सुखाचे, आनंदाचे प्रतीक असलेला पाऊस त्याच्या अंगावर येतोय; या मजुराचे कुणीच नाही म्हणून त्याच्या अंगावर पडून त्याच्यावर स्नेह-प्रेम वर्षाव करतोय. या मजुराच्या झोपडीकडे कुणीही येऊन थांबत नाहीये. म्हणून पाऊस 'रेंगाळलेला' आहे, असे कथन केलेले आहे.

या ताडपत्रीच्या झोपडीत फुललेल्या संसाराच्या सुखद स्मुतींना तो आळवतो. झोपडीत फिरणाऱ्या चंद्रप्रकाशात 'गोंदलेय मी माझ्या बयेच अंग' या ओळीतील 'अंग गोंदणे' या प्रतिमेतून शारीर संवादाचे संयत वर्णन करण्यात आलेले आहे. एका बांधकामाच्या साईटवरून दुसरीकडे गेल्याचा संदर्भ धुरकटलेल्या चुली एका ताडपत्रीखालून दुसऱ्या तांबड्या किंवा पिवळ्या ताडपत्रीखाली नेल्याच्या कृतीतून देण्यात आलेला आहे.

खूप वेळ लोटून गेल्यावरही त्याचे प्रेत कुणीच न हलवल्याने मला माझ्या घरात हलवा, असे म्हटल्यावर आवाज ऐकूनही ही महानगरातील माणसे न ऐकल्यासारखी करीत आहेत. कारण आपण या गावात बाहेरचे आहोत, ही तुटलेपणाची खंत व्यक्त करण्यात येते. दुपारच्या वेळी जेवणासाठी घरी जात असलेल्या नोकरदारांनी प्रेत पाहिल्यानंतरही भरपेट जेवण केले असेल. त्याच्या नाकात कोंबलेले कापसाचे दोन बोळे बघून त्यांना काहीच वाटले नसेल. कारण महानगरात फुटपाथवरचे मरण जाता-जाता पाहून डोकावण्याची त्यांची सवय त्याला ठाऊक होती. उलट हा माणूस इथेच येऊन कसा मरून पडला? असा विचार करीत या बाहेरच्या लोकांनीच शहराला घाण केल्याचे ते आपल्या मुलांना शिकवतील. त्यांचे स्वीट-चिली टोमॅटो सॉस खाताना स्वतःशीच गुणगुणणे त्यांच्या चंगळखोर वृत्तीचे निदर्शक ठरते. असे असंस्कृत असलेले लोकच स्वतःच्या कॉलनीला सुसंस्कृत समजून, उपऱ्या मजुराने मेल्यावरही आपल्या कॉलनीला सोडले नाही, असे दोषारोप करणार हे त्याला ठाऊक आहे.

महानगरात वास्तव्याला असलेला बांधकाम मजूर कबुतरांशी तादात्मिकरण करून घेतो. महानगरातील माणसांपेक्षा कबुतरांशी त्याचे हृदय नाते होते, याचा प्रत्यय तो कबुतरांना रोज दाणे खायला देत असे, यावरून येतो. त्या कबुतरांना दाणे टाकण्यासाठी हात हलवून बघतो तर ते हालत नाहीत, दात घशात शिरल्यासारखे वाटणे, बोलताही न येणे या वर्णनातून त्याच्या सहृदयतेची जाणीव करून देण्यात आलेली आहे. परिसंस्थेतील छोट्या जीवांकडे-कबुतरांकडे सहानुभूतीने पाहणे, त्यांच्या भुकेचा विचार करणे यातून बांधकाम मजुरात असलेल्या मानवतेचे दर्शन घडते. तर बांधकाम मजुराच्याप्रती वागणाऱ्या सोपिस्टिकेटेड माणसांच्या वागण्यातून, त्यांच्यातील अमानवीपणाचा प्रत्यय येतो.

मजूर स्वतःविषयीची माहिती देताना, तो मागच्याच आठवड्यात आपल्या मूळ गावी फॅमिली फोटो काढण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याच्या बायकोच्या मालकिणीने या कृतीवर 'माजलेत' असा मनातल्या

मनात शेरा दिला असेल, असे तो जाणतो. गोतावळ्यातील सगळ्या लोकांनी त्याची तब्बेत खराब झाल्याचे त्याला सांगितले. यातून त्याच्याप्रती त्याच्या लोकांना असलेले प्रेम व जिव्हाळा व्यक्त होतो. ही त्याच्यासाठी एक सुखद स्मृती आहे. अशीच आणखी एक सुखद स्मृती बांधकामावरच्या मालकाची लहानगी मुलगी खायला देत असलेले खाद्यपदार्थ तो त्याच्या चिमुकल्यांना घरी नेत असे. तिने दिलेला खाऊ चिमुकल्यांना देण्यासाठी त्याने केलेल्या अट्टाहासातून त्याच्यातील पितृहृदयाचे दर्शन घडते.

मालकाने औषधोपचारासाठी पैसे न देता नुसतेच डॉक्टरकडे जायला सांगणे त्याला कळत होते. लाखो-कोट्यावधी रुपये कमावणारे मालक आपल्या नोकराच्या आजाराविषयी उदासीन असणे, त्याला मदत न करणे, उलट त्याच्याकडून बांधकाम मजुरीचे काम करवून घेत राहणे, ही नव्या शोषणव्यवस्थेत रुजलेली वेठबिगारीच आहे ,असे म्हणता येते.

या आत्मकथनातून तो स्वतःचेही तटस्थपणे वर्णन करतो. त्याचे दारू पिणे त्याच्या बायकोला खटकत असे. ती तिच्या मालकिणीजवळ याविषयी ओक्साबोक्सी रडत असे. आता त्याच्या मृत्यूमुळे ती रडतेय. आपण रात्री-बेरात्री पिऊन आल्यावर तिला बेदम मारत असल्याचीही तो कबुली देतो. दिवसभराच्या कष्टाच्या वेदना सहन होत नसल्याने मद्यपान करीत असल्याचे तो सांगतो. त्याची बायको मालकिणीप्रमाणे कपाळाबरोबर केसांत कुंकू भरते याचे त्याला अप्रूप वाटते. पोरं उठायच्या आत ती सर्व कामे निपटते, यावरून तिच्या कष्टाळूवृत्तीचा प्रत्यय येतो. तिच्याप्रती असलेले प्रेम त्याच्या मनात दाटून आल्याने तिच्या कपाळाला हात लावून तुझे कुंकू जिवंत असल्याचा तिला दिलासा द्यावा म्हणून तो प्रयत्नही करून पाहतो,परंतु हे स्वप्नच ठरते.

कवितेच्या उत्तरार्धात असे वर्णन करण्यात आलेले आहे की, मजुराच्या मृत्युनंतर त्याच्यासाठी माणसे कुणीच जमत नाहीत. ज्या दोन कबुतरांना तो दाणे खायला घालत असे त्या कबुतरांनी त्याच्याविषयीचे दुःख व्यक्त करण्यासाठी कितीतरी कबुतरांना बोलावून आणले आहे. हे दृश्य बघून कबुतरे घाण करतील म्हणून आजुबाजूचे घरमालक रागावतील असे तो सांगतो. त्याला आजुबाजूच्या माणसांपेक्षा कबुतारांसोबत राहून निष्कपट प्रेम, अहिंसात्मक जाणीवा वृद्धिंगत झाल्याचा प्रत्यय येतो. आपण या पृथ्वीवरील दुःखी-कष्टी जीवनानुभवांपेक्षा अलौकिक सुखाचा अनुभव कबुतरांच्या सान्निध्यात घेतो, ही खास अनुभूती हवेत 'उडायसारखं वाटतं' या शब्दांतून व्यक्त करण्यात आलेली आहे. या अनुभवाची तुलना तो मालकाने विमान हवेत वर तरंगत असल्याचे सांगितलेल्या अनुभवाशी करतो. मृत्युनंतर आपण हवेत तरंगलो आहोत, आपल्याला अधांतरी ठेवू नये, जमिनीवर घ्यावे, असे आवाहन तो त्याच्या बायकोला करतो. 'वर राहून काय करू' या प्रश्नातून त्याचे जमिनीशी असलेले घट्ट नातेच अधोरेखित होते.

कवितेच्या शेवटी तो आवाहन करतो की, कुणीतरी त्याच्या बायकोची समजूत घालावी. ती दांडगी हिम्मत असलेली स्त्री आहे. तिने गोतावळ्याला जमा करावे आणि आपले प्रेत मूळ गावाकडे घेऊन जावे. कारण गेल्यावेळी पलीकडील गल्लीतील कुंड्या नावाच्या बांधकाम मजुराला बाहेरगावचा किंवा उपरा मानून स्मशानात जाळायलाच मनाई करण्यात आली होती. आपल्या प्रेताचीही तशीच गत होईल, अशी भीती त्याला वाटते. तिने त्यासाठी काहीही व्यवस्था लावावी तोवर 'मी लटकत राहतो इथंच वर' तो असे म्हणतो. इथे कविता संपते. मात्र अनेक प्रश्न या निमित्ताने उभे राहतात. महानगरांना उभारणारी, त्यांना सुंदर करणारी, वेळ -प्रसंगी त्यातील घाण उपसणारी कष्टकरी माणसे आपले सर्वस्व महानगरासाठी देतात. महानगरासाठी झटताना त्यांच्या श्रमांचा अवमान होतो, 'माणूस' म्हणून त्यांना वागवले जात नाही, त्यांच्या शोषणाविषयी कुणालाच काहीच वाटत नाही. निष्ठूर, संवेदनहीन होत-होत महानगरीय माणूस कसा हिंसक बनलेला आहे, याची पोलखोल या कथनातून करण्यात आलेली आहे. झाडे, जंगले नष्ट झाल्याने कबुतरांनी महानगरातील बहुमजली इमारतींत, आपले अस्तित्व टिकवण्यासाठी तडजोड स्वीकारलेली आहे. ते जसे असुरक्षित,उघड्यावर

आहेत त्याप्रमाणेच दुष्काळ, नापिकी, बेरोजगारी यासारख्या समस्यांमुळे खेड्यांतील तरुणांनी महानगरांत येऊन आपल्या अस्तित्वासाठी निवडलेला तडजोडीचा पर्याय त्यांच्यासाठी वेदनादायक ठरतो. या वेदनांची ठसठस म्हणजेच हे मेलेल्याचे आत्मकथन होय.

या कवितासंग्रहातील कथनाचा वेगळा बाज असलेली 'रस्त्यावरचे रास्त रस्ते' ही कविता होय. रस्ते जिवंत असल्याचे मानून रस्ते माणसांच्या प्रवासाच्या अगणित किस्से, कहाण्यांचे साक्षीदार असतात. रस्त्यांवर घसरलेले, मुरगळलेले पाय, कितीतरी लैला-मजनुंनी एकमेकांना रस्त्यावर घातलेल्या बेधडक मिठ्या, भोपळ्यात बसून लेकीच्या घरी जाणाऱ्या चतुर म्हातारीची कहाणी, रस्ता बनविणाऱ्या मजुरांच्या कष्टांचे आठव अशी वैविध्यपूर्ण संदर्भविपुलता व अनेक घटितांतून गोष्टींची केलेली गुंफण रस्त्याविषयीच्या कथनाचा पैस दर्शवितात. रस्तेच माणसांना सकारात्मक उर्जा देतात, असे ज्ञानात्मक विधान करून रस्त्यांच्या प्रतिमेतील दृकसंवेदना अशा रीतीने व्यक्त झालेली आहे,

*विस्फारून पाहत राहतात खांबावरच्या प्रकाशात*
*मैलाच्या दगडांचे डोळे चिकटून राहतात खांबांना*
*आणि प्रकाश किरणे बजावत राहतात*
*पार केलेल्या अंतराबद्दल*
*सूचना देत राहतात उरलेल्या अंतराच्या*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ.४२)

सर्व प्रकारच्या अंतराची माहिती देणारे रस्त्यावरील मैलांचे खांब गाव व देशांनाही ओळख बहाल करतात. कवितेतील 'मी'ला जेव्हा जेव्हा त्याला त्याच्या गणगोताची आठवण येते तेव्हा मैलाचे दगडच त्याला ही दोहोंतील अंतराची जाणीव करून देतात. अंतराची जाणीव करून देणाऱ्या रस्त्यांप्रमाणेच अनेक मूर्त वस्तूंचे अस्तित्त्व आपण गृहीत धरत असतो. यामुळेच भोवताली असलेल्या वस्तूंकडे आपले पाहणे व कवीचे पाहणे यात अंतर पडते. आपल्या धारणा या व्यावहारिक उपयोगितेवर आधारलेल्या असल्याने व कवीच्या धारणा या चिंतनशीलतेवर व संवेदनक्षमतेवर पोसलेल्या असल्याने कवीचे पाहणे हे अनन्य ठरते. त्याच्या अलौकिक प्रतिभाशक्तीचे द्योतक ठरते. त्यामुळेच पोतदारांच्या कवितेतील कथन हे वेगळ्या स्वरुपात नियत होते.राजन गवस यांनी 'खेळ खेळतो उंबरा' या कवितासंग्रहाच्या पाठराखणीत म्हटल्याप्रमाणे या कवितेचे अनवटपण अशा रीतीने अनुभवाला येते.

'सूर्याची आवक जावक वाढतच राहिलीय' या कवितेतून जागतिक तापमानवाढीच्या समस्येकडे लक्ष्य वेधले आहे. तसेच 'तुम्ही इथे आहात या कवितेत संगणक मानवी जीवनाला व्यापून कसा दशांगुळे उरत आहे, याचे सूचक चित्रण करण्यात आले आहे. इंटरनेटच्या सहाय्याने संगणकाचा होत असलेला अपरिमित वापर हा माणसाला त्याच्या भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांना एकाचवेळी अनुभवण्याचा आनंद देत आहे. तसा त्याचे वर्तमान स्वास्थ्य हिरावून घेत आहे; हे दुहेरी वास्तव कवीने टिपलेले आहे. भारतीय पुराणकथेतील नारदमुनींना तीनही लोकांत अवतरण्याची शक्ती अवगत होती. समकाळात व्यक्ती जगभरातील अनेक ठिकाणी, अनेकांशी सहजपणे संवाद करू शकते. आपसांत बोलणारे एकमेकांना लाईव्ह पाहू शकतात. ही पाहण्याच्या मितीची व्यापकता काव्याशयाची नवीनता दर्शविते. अनेक गोष्टी या ऑनलाईन पद्धतीने होऊ लागल्याने इंटरनेट हे सत्ता गाजविण्याचे नवे शस्त्र झाले आहे. असे असले तरी मानवाने घ्यावयाचा शोध हा बाहेरील घटिते, दृश्ये, वस्तू यांच्याकडून आत्मशोधाकडे नेला पाहिजे, हे वैचारिक भान कवितेतून प्रकट झालेले आहे.

'ओमीची कविता' ही एक लक्षणीय संहिता आहे. ओमी म्हणजे कवितेतील 'मी' ने स्वतःचीच रचलेली गोष्ट, स्वतःचेच केलेले तटस्थ परीक्षण, एक भावावस्था होय. संवेदनशील व्यक्तीने घेतलेला एक आत्मशोध म्हणजे 'ओमी' ही अवस्था होय,असाही अर्थ घेता येईल.सामन्यपणे जीवन जगताना व्यक्तीला करावा लागणारा संघर्ष, अपयशातून आलेली हतबलता निराशेकडे ढकलते. यामुळे आत्मविश्वास कमी होत जातो.आजूबाजूच्या हरेक गोष्टीकडे संशयाने पाहण्याची वृत्ती जोरकस होत जाते. अशा अवस्थेतील व्यक्ती आपल्यातच काहीतरी उणीव आहे, या भावनेने स्वतःलाच टोचणी लावत राहते. या स्थितीतील व्यक्ती

नैराश्य, उदासीनतेमुळे वैफल्यग्रस्त होऊन एक प्रकारे जिवंतपणी स्वतःलाच मारत असते. अशा व्यक्तीच्या भावावस्थेचे वर्णन करणारी गोष्ट कवी रचतो. ती अशी,

*थडग्यावर बसून राहतोस तू स्वतःच्याच*
*तुला सापडत नाही तुझा आकार*
*तुला ऐकू येत नाही तुझा आवाज*
*वर येऊ पाहतोस बारबार, बारबार*
*खोल खणून ठेवलेले हे थडगे*
*थडग्याखालचे खोल खोल थडगे*
*तुझ्या श्वासांचे हुंकार तुलाही ऐकू येऊ नयेत*
*म्हणून सुडाच्या काचभिंती*
*स्वतःवरचा विश्वास कणभरही वाढू नये म्हणून*
*राखण करीत संशयित सैनिकांचे बटालियन बरोबर*
*त्यांच्यासाठी तू सैनिकही आहेस आणि शत्रूही*
*पण, तुला विधिवत पोहचवलंय थडग्यात म्हणून तू त्यांचा*

(खेळ खेळत राहतो उंबरा, पृ. ४९)

अशा रीतीने नकारात्मकतेतून जात असलेल्या माणसाला त्याचा आंतरिक अवकाश उमलू देत नाही. व्यवस्थेत त्याचे दमन होत राहते. दमनकारी व्यवस्थेमुळेच 'ओमीचा जन्म होतो. समाजात अधिकाधिक ओमी जन्माला येणे हे रोगट व मागास समाजाचे लक्षणही मानता येईल. समकाळात अशा माणसांची संख्या वाढत जाणे, हे ढासळत्या मूल्यऱ्हासाचे सूचन ठरते. 'अ कविता ऑन कुजके दिवस' या कवितेत हल्लीचा काळ कवींसाठी आव्हानात्मक ठरत आहे. आभासी दुनिया सत्य मानून जीवन जगणाऱ्या लोकांना मूल्यव्यवहार कुचकामी वाटतो. असे लोक हिंसक जमावात सहजपणे सामील होतात. अशा माणसांना स्वतःच्या आभासी प्रतिमेच्या प्रेमात आकंठ बुडून रहायला आवडत असल्याचे कथन कवीने रचलेले आहे. दिवस कुजके होणे या प्रतिमेतून ढासळलेल्या सामाजिक स्वास्थ्याकडे, अनैक्याकडे लक्ष वेधण्यात आलेले आहे. हिंसेला प्रवृत्त करणे, हिंसेत सामील होणे, माणसे मरताना किंवा मारताना संवेदनहीन होत त्यांचे व्हिडीओ बनवून ते इतरांना पाठवीत राहणे यासारख्या कृतींविषयी वास कुठून येतोय ? असा प्रश्न उपस्थित करून कवी वाचकांना सजग करतो. सत्तेच्या मुजोरी व अन्यायाविरोधात आवाज उठविणाऱ्या लोकांना जीवे मारणे, कल्याणकारी राज्यव्यवस्था गुंडाळून ठेवणे, विचारांचा सामना विचारांनी न करता विरोधी विचारांच्या लोकांना ठार करणे, अशा नृशंस वातावरणात कवितेतील संवेदनक्षम 'मी' ला रक्ताची मळमळ होणे स्वाभाविक ठरते. समकाळाच्या अशा हिंसक तडाख्यांनी संवेदनहीन जीवन जगत असणारी माणसे पाहून कवीला वैताग व उबग येतो. हे समाजवास्तव पचविणे त्याला असह्य होते. अशा वेळी तो स्वतःला व्हॅनगॉगच्या फुलांच्या निकट नेऊ पाहतो. माणसाने निसर्गाच्या जवळ जाण्याचे माध्यम म्हणजे कला होत. कलेवर प्रेम करीत व्हॅनगॉगच्या नजरेतून निसर्ग पाहिला तर माणूस हिंसेपासून परावृत्त होईल. यासाठी त्याच्याकडे रसिकाची दृष्टी हवी. ही दृष्टी घडविण्याचे काम नकळतपणे कविताही करीत असते. कवीने फॉर्मची मोडतोड या संहितेत केलेली आहे. सामान्य विधाने व काव्यात्मक विधानांची सरमिसळ, इंग्रजी शब्द-वाक्यांची योजना ही युरोप-अमेरिकी जीवनशैलीचे भारतीय जीवनशैलीवरील आक्रमण सुचवते.

पोतदारांच्या कवितेतील मूल्यभान वेधक आहे. 'एकटेपणा' या कवितेत समकालीन जीवनाला आलेले एकारलेपण, आपल्या अस्तित्वाच्या क्षणभंगुरतेने वेढलेले एकटेपण मनःस्वास्थ्यासाठी हानिकारक ठरते. कवितेतील 'मी' एकटेपणा या अवस्थेला भुताची उपमा देतो. भुते ही काल्पनिक असतात. भूतांविषयीच्या भीतीच्या दंतकथा समाजात प्रचलित असतात. त्यामागील भावार्थाचे आरोपण करून एकटेपणाची भूतं या प्रतिमेतून एकटेपणा हा अनुभव, मनाची एक अवस्था भुताप्रमाणे भयंकर झाली असल्याची अनुभूती प्रकट केलेली आहे. अशा मनोवस्थेतील व्यक्तीचा आत्मविश्वास कमी होऊन साध्या साध्या गोष्टींतून मिळणाऱ्या संवेदनानुभवांना, आनंदक्षणांनाही ती पारखी होते. अशा व्यक्तीला आजूबाजूचा पक्ष्यांचा किलबिलाट, गाईचे हंबरणे किंवा समुद्रकिनाऱ्यावरील वाळूत पावले रेखाटणाऱ्या मुलांच्या गुजगोष्टी कानांवर पडत असूनही ऐकू येत नाहीत. 'ही एकटेपणाची भूतं अंगभर विखुरलीयेत' या उद्गारातून वर्तमान माणसाच्या मनातील

नैराश्याची प्रतीती येते. या कवितेतील कथन नाट्यमय आहे. कवितेतील 'मी' आपल्यात रुतलेल्या एकटेपणाच्या भुताला पोत्यात घालून, त्या पोत्याचे तोंड दणकट सुतळीने बांधून भुताला जेरबंद करून सरस्वती या नुकत्याच शोधण्यात आलेल्या आकाशगंगेवर फेकून देण्याची कल्पना करतो. या कल्पितातून हे सूचित होते की, भौतिक विकासाच्या मागे धावत असताना माणसे एकटी पडत जाऊ नये. पृथ्वीवर माणूस हा प्राणी बहुसंख्य असताना एकेका माणसात असे नकारात्मक एकटेपण रुजू नये. माणसांतच माणसांनी फुलावे, बहरावे, सुसंवादी असावे. असा सूचक आशय कवी घडवतो.

'आणि मग...' या कवितेत संवादात्मक शैलीत वाचकांना केलेले आवाहन कवीच्या वैचारिकतेचा प्रत्यय देणारे आहे. समाजातील हिंसेचा अव्हेर करून हिंसा पसरविण्याचे षड्यंत्र रचणाऱ्यांना नामोहरम करण्याच्या क्लुप्त्या काव्यार्थातून सूचित होतात. या कवितेतील 'विचारत राहू नका' ही वाक्यावृत्ती सकारात्मक, शांत राहण्यासाठीच्या वर्तनाला पूरक ठरते. समाजाला बागेची उपमा देऊन कवी सर्व जाती– धर्मांच्या समूहांना एकत्रित फुलण्या-बहरण्याचे स्वप्न दाखवतो. तलवारी म्यान करून ठेवून, बंदुका प्रेतांबरोबर पेरून टाकण्याचे आवाहन अहिंसक मार्गाकडे घेऊन जाणारे आहे. मूल्यभानाचा भाग म्हणून 'नर्मदेची डियर मेधा' ही संहिता घडलेली दिसते. 'स्व'केन्द्री होऊन आपल्याच कैफात जीवन जगणाऱ्या मध्यमवर्गीयांच्या स्वार्थी व सुखलोलूप वृत्तीचा उपहास करून कवी मेधा पाटकरांच्या कर्तृत्त्वाचा व निःस्वार्थी वृत्तीचा गौरव करतो. मेधा पाटकर या जिवंतपणीच एक मिथक बनून राहिल्या आहेत. कवी कवितेतून त्यांचे स्मरण जागवून सामाजिक बांधिलकीचा जागर करतो. पोतदारांच्या कवितेतील भाषाभानही वेधक आहे. कवीने आजच्या पिढीतील वाचकाला केलेले आवाहन म्हणजे 'उच्चार तू हा शब्द' ही कविता होय. शब्द, भाषा, कविता या मौलिक गोष्टी आहेत. सर्जनशील उच्चार दाबला जात असेल, तो पुसण्याचा प्रयत्न होत असेल तरीही बुरुजाची शांती दिसेपर्यंत घोकंपट्टी करीत राहिले पाहिजे. किंबहुना निःशब्दतेतूनही शांतीचा संदेश देत राहिले पाहिजे. असा शांतीचा उद्घोष करणारी भाषा मला येते; ती तू(वाचकाने) उच्चारावी. हा कवीचा लोभस आग्रह अशांत, हिंसक झालेल्या समाजाला माणूसपणाकडे घेऊन जाणारा शाश्वत विचार आहे. यासाठी वाचकाने कवीला किंवा कवितेला पाहण्याऐवजी ऐकले, वाचले पाहिजे. कवीचे शब्द, कवीची भाषा आपलीशी केली पाहिजे. टी.व्ही. व सोशल मीडियातील हिंसक भाषेमुळे माणसांची विचार करण्याची क्षमता खुरटी होऊन समाजाला भाषावापराच्या पातळीवर कुंठीतावस्था आलेली आहे. त्यावरील धूळ झटकण्याचे काम आशुतोष पोतदारांची कविता सहजपणे करते. म्हणून कवी म्हणतो, 'उच्चार तू हा शब्द / उच्चारू दे त्यानांही' असे भाषेवर म्हणजेच आपल्या भूमीवर, त्यातील परंपरेवर, संस्कृतीवर निरतिशय प्रेम करण्याचा त्यातील रास आणि गोंडर वाचकांच्या पुढ्यात ठेवून हवे ते स्वीकारण्याचा पर्याय खुला आहे.

**संदर्भ**

पोतदार आशुतोष, खेळ खेळत राहतो उंबरा, कॉपरकॉईन प्रकाशन दिल्ली, २०२०

■■■

**संपर्क** : ९१७५१६४७९९

मुराळीचे अर्थकारण वर्गणीवर चालते. वर्गणी पाठवून सहकार्य करा.
वर्गणी पाठविण्यासाठी बँक खाते नंबर खालीलप्रमाणे –
*Bank of Baroda, Murali Trust A/c. No. 38120100000285, IFSC - BARB GARGOT*
या संदर्भात मदत हवी असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा.
९४२११३८८७२, ९७६५७८७३१३, ८२७५४४९६१६
ऑनलाईन पद्धतीने खात्यावर वर्गणी पाठवल्यास त्याची माहिती व आपला पत्ता आपल्या कायमच्या संपर्क क्रमांकासह वरीलपैकी कोणत्याही नंबरवर पाठवा.